# श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था

# ( शिंगणापूर )

ता.नेवासा, जिल्हा. अहिल्यानगर  पिन- ४१४१०५

Website : www.shanidev.com  E-mail : shanishingnapur@yahoo.com

Phone No : 02427-238110

## सन – २०२६

## ( एप्रिल २०२६ ते सप्टेंबर २०२६ )

# दरपत्रक सूचना क्र.१

## श्री शनैश्वर देवस्थान करिता
## स्टेशनरी साहित्य पुरविणेबाबत.

प्रसिद्धी दिनांक – १३ /०४/२०२६

- श्री.शनैश्वर देवस्थान, शिंगणापूर करिता भांडार विभागाकरिता स्टेशनरी साहित्य खरेदी करणेकामी एप्रिल २०२६ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीसाठी दरपत्रक मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती –**

1. दरपत्रक सादर करावयाचे आहे त्या नावाने अदययावत दुकान नोंदणी दाखला (Shop Act) सादर करणे अनिवार्य राहिल.
2. दरपत्रक सादर करावयाचे आहे त्या नावाने पॅन कार्ड सादर करणे अनिवार्य राहिल.
3. दरपत्रक सादर करावयाचे आहे त्या नावाने GST प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.
4. बयाणा रक्कम रु. 5000/–चा धनाकर्ष (D.D) SHRI SHANISHWAR DEVASTHAN यांचे नावे (Payable at Bank of Maharashtra Sonai) देण्यात यावा. सदरचा धनाकर्ष (D.D) सिलबंद लिफाफ्यामध्ये सादर करणे अनिवार्य राहील.
5. दरपत्रक धारकाने स्वतः साठी अगर दरपत्रक धारकासाठी कुणीही कोणत्याही स्वरूपाचा, कोणत्याही कारणास्तव संस्थानचे विरोधात केलेला दावा/अर्ज कोणत्याही न्यायालयात प्रलंबीत नसावा. तसेच दरपत्रक धारकाचे नाव संस्थानचे काळया यादीत समावेश नसावे. याबाबत स्वघोषणा पत्र जोडावे.
6. दरपत्रकासोबत Hard Copy कागदपत्रे सादर करावयाची आहेत.
7. दरपत्रक धारकाने स्वतः स्वाक्षरी केलेले दरपत्रक लिफाफ्यामध्ये सिलबंद करून सादर करावे.
8. सदर दरपत्रक दि. 13/04/2026 रोजी सकाळी 11 वा. पासून दि. 18/04/2026 रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत देवस्थान कार्यालयात मिळतील अथवा देवस्थानचे संकेतस्थळ www.shanidev.com वर डाउनलोड करता येईल.
9. सदरचे दरपत्रक सिलबंद पाकिटामध्ये दि. 18/04/2026 रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत (रविवार खेरीज) संस्थानचे शिंगणापूर येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावे. वेळेत न येणारे दरपत्रक स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.
10. सदरचे दरपत्रक दि. 20/04/2026 रोजी स.11.00 वाजता उघडण्यात येतील. सदरील प्रक्रियेदरम्यान आपण कार्यकारी अधिकारी, यांचे दालन, देवस्थान प्रशासकिय कार्यालय, शिंगणापूर येथे उपस्थित रहावे.
11. दरपत्रक सादर करावयाचे आहे त्या फर्मची सन, 2022–23, 2023–24 व 2024–25 या 3 आर्थिक वर्षांची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम (रू. 2,00,000/–) असणे अनिवार्य राहील. तसे उलाढाल नमुद असणारे सी.ए यांचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.
12. प्रत्येक मालाचे मालनिहाय दर वेगळयावेगळयाने मागविण्यात आले आहे आणि त्याची अपेक्षित मागणी एकत्रितपणे नमूद केली आहे. मागणीनुसार त्या त्या मालाची होणारी एकूण किंमत यांची बेरील केल्यानंतर संपूर्ण प्रकारच्या सर्व मालांची एकत्रित किंमत काढण्यात येईल आणि त्यावरून L-1 ठरविण्यात येईल. तथापि काही मालांच्या बाबतीत अशा प्रकारे ठरविलेल्या L-1 पेक्षा इतर दरपत्रक धारकांचे दर कमी असल्यास एकंदरित L-1 ला इतर मालनिहाय L-1 दरपत्रक धारकाचे त्या त्या मालाचे बाबतीतचे दर मॅच करण्याची (जुळविण्याची) संधी देण्यात येईल आणि त्याला एकत्रित खरेदी आदेश देण्यात येईल. तथापि त्याने अशा पध्दतीने दर न जुळविल्यास त्या त्या मालासाठी त्या त्या मालाचे कमीतकमी दर नमूद करणा–या दरपत्रक धारकांना खरेदी आदेश देण्यात येईल.
13. दरपत्रक सादर करताना दरपत्रक धारकांनी आपले फोन नंबर्स नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणा–या दरपत्रक धारकांना त्याबाबत कळविता येईल.
14. दरपत्रकामध्ये दर भरतांना GST अगर इतर कुठलाही शासकीय कर तसेच पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च,जकात, वाहतूक, वाराई वगैरे सर्व खर्चासह श्री.शनैश्वर देवस्थान, शिंगणापूर संस्थानचे भांडार विभागामध्ये पोहोचचे दर या सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत.
15. खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या दरपत्रक मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत मालाचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रक्कमेच्या 3% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल दरपत्रक मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या पुरवठा केलेनंतर आपण मागणी पत्र दिल्यानंतर परत करता येईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

16. श्री.शनैश्वर देवस्थान, शिंगणापूर येथे समक्ष येऊन रु. 500/– चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी पुरवठाधारकास अदा करावी लागेल. करारनामा केल्याशिवाय बील अदा केले जाणार नाही.
17. माल पुरवठा करण्याचा पुरवठा कालावधी 6 महिने राहिल.
18. माल पुरवठा मागणी आदेश दिलेपासून जास्तीत जास्त 08 दिवसात मालाचा पुरवठा करावा लागेल. प्रसंगी दूरध्वनीवर कळविलेनुसार तात्काळ पुरवठा करावा लागेल.
19. कोणत्याही कारणामुळे जर मंदिर बंद ठेवावे लागले तर अशा कालावधीमध्ये दरपत्रकामध्ये खरेदी करण्यासाठी दर्शविलेले अंदाजे परिमाण (Estimated Quantity) प्रमाणे माल खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.
20. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठाकालावधीत अगर पुरवठा कालावधी संपल्यानंतरही पुढील खरेदीसंबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा 25 टक्केपर्यंत जादा मालाची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या मालाचा पुरवठा मान्य दरानेच करणे दरपत्रक धारकावर बंधनकारक राहील.
21. पुरवठा आदेश दिल्यानंतर पुरवठा आदेशात नमूद मालाचा पुरवठा हा एकदम करावयाचा नसून संस्थानचे गरजेप्रमाणे मागणी चलन/आदेश पुरवठादारास पाठविण्यात येतील. दरपत्रक किंवा पुरवठा आदेशात नमूद मालाइतके परिमाण (Quantity) खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.
22. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच मालाचा/साहित्याचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच मालाचे/साहित्याचे बिल सादर करावे.
23. ज्या मालाच्या दरपत्रक मंजुर होतील तो सर्व माल मान्य झालेल्या त्याच दर्जाचा व जातीचा पुरवावा लागेल. कमी दर्जाचा, वेगळ्या प्रकारचा अगर जातीचा किंवा खराब माल स्विकारला जाणार नाही. असा माल पुरवठा झाल्यास तो स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे व तातडीने चांगल्या दर्जाच्या मालाचा पुरवठा करणे दरपत्रकाधारकावर बंधनकारक राहील. सदोष माल न नेल्यास, त्या मालाची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.
24. आदेशाप्रमाणे संस्थानकडे माल पाठविल्यानंतर संस्थानने विहीत केलेले यंत्रणेकडून मालाची तपासणी केली जाईल. त्यांना योग्य वाटल्यास माल स्विकारण्यात येईल. तथापि माल स्विकारलेनंतरही त्यातील माल खराब आढळल्यास तो तात्काळ बदलून दयावा लागेल. सबब पुरवठाधारकांनी दिलेल्या नमुन्याप्रमाणे माल पुरविण्याची दक्षता घ्यावी.
**25.** पुरवठा करीत असलेल्या माल स्विकारलेनंतरही एखादा लॉट, साहित्य अगर काही माल खराब आढळल्यास तो माल स्वखर्चाने तातडीने बदलून द्यावा लागेल.
26. पुरवठा आदेशातील माल मुदतीत पुरविला नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रु. 2.00 लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा 0.50% दराने जास्तीत जास्त 10% पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रु.2.00 लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा 0.50% दराने जास्तीत जास्त 5% पर्यंत |
| पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रू. 2.00 लक्ष पर्यंत असल्यास अ प्रमाणे दंड करण्यात येईल व त्यापुढील रकमेस ब प्रमाणे दंड करण्यात येवून एकूण दंड रक्कम अ + ब प्रमाणे वसुल करण्यात येईल. | |

27. सदर माल पुरवठा करण्यास विलंब झाल्यास त्यावर थेट अट कं. 26 प्रमाणे दंड आकारण्यात येईल. तसेच त्या दरम्यान संस्थानला बाहेरुन माल विकत घ्यावा लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेला माल किंमतीच्या अट कं. 26 प्रमाणे दंड देय असलेल्या कुठल्याही मालाचे बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.
28. पुरविलेल्या मालाचे बिल मालाची तपासणी करुन, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच अदा करणेत येईल. मालाच्या पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.
29. मालाची तपासणी करुन ताब्यात घेतलेल्या मालाचे बील संस्थानकडे सादर केलेपासून 15 दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला अदा करण्याचा प्रयत्न राहिल. तथापि तांत्रिक कारणांमुळे बील अदा करणेस विलंब झाला तरीही आपणास संस्थानने मागणी केलेल्या मालाचा पुरवठा थांबविता येणार नाही.
30. सदर दरपत्रकाची वैधता कालावधी दरपत्रकाच्या अंतिम तारखेपासून 60 दिवसांचा राहील.
31. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो नेवासा कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

32. पुरवठादाराने मालाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी–शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील 3 वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल अथवा याबाबत मा.प्रशासक / कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत आपली काहीही तक्रार चालणार नाही.

33. कोणतेही दरपत्रक अंशतः / पुर्णतः स्विकारणे / नाकारणे किंवा सर्व दरपत्रक नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.

34. सशर्त दरपत्रक तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर दरपत्रकातील नमूद अटी–शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या दरपत्रक धारकांचे दरपत्रक रद्द करण्यात येतील.

35. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी / शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. दरपत्रक धारकाची कोणतीही अट / अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.

36. **खरेदी विभागाकडून मालाच्या पुरवठ्यासाठी वेळोवेळी केलेल्या ई–मेल, व्हॉटस्अप व भ्रमणध्वनी आणि दुरध्वनीवरील संवाद / पत्रव्यवहार हा कुठल्याही कायदेशीर कारवाईसाठी (Legitimate Actions) अत्यंत महत्वाचा भाग म्हणून गणण्यात येईल याची प्रथम प्राधान्याने नोंद घ्यावी.**

(अतुल चोरमारे)
कार्यकारी अधिकारी,
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था
शिंगणापूर

# दरपत्रक धारकाबाबत माहिती

1. फर्मचे नांव – ___________________________________________
2. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता – ___________________________________________
3. दूरध्वनी क्रमांक – ___________________________________________
4. ऑफीस – ___________________________________________
5. दुकान – ___________________________________________
6. निवास – ___________________________________________
7. मोबाईल नंबर – ___________________________________________
8. फॅक्स नंबर – ___________________________________________
9. ईमेल – ___________________________________________
10. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव– ___________________________________________
11. दूरध्वनी / मोबाईल क्रमांक– ___________________________________________
12. मालकाचे नाव 1.___________________________________________
    2.___________________________________________
13. बॅक खाते नांव – ___________________________________________
14. शाखा ___________________________________________
15. खाते नंबर व प्रकार ___________________________________________
16. आयएफएससी कोड ___________________________________________

दिनांक :– / /2026

ठिकाण :–

दरपत्रक सादर करणारे

नाव ..................................................

स्वाक्षरी ............................................

शिक्का ............................................

# परिशिष्ट “अ”

# दरासंबंधीचे प्रपत्र

एप्रिल २०२६ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीसाठी भांडार विभागाकरिता विविध स्टेशनरी साहित्य पुरवठयासाठी परिशिष्ट.

| अ. क्रं | साहित्याचे नाव | क्वालिटी/कंपनी | अंदाजित मागणी | | दर प्रति नग GST सह | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | संख्या | परिमाण | | |
| 1 | थर्मल प्रिंटर्स रोल 3′′ | बेस्ट क्वालिटी | 1800 | नग | | |
| 2 | 100 पेजेस नोटबुक | (Classmates) | 100 | नग | | |
| 3 | 200 पेजेस नोटबुक | (Classmates) | 100 | नग | | |
| 4 | ए 4 पेपर रीम | (B2B) | 200 | नग | | |
| 5 | लिगल पेपर रीम | (B2B) | 30 | नग | | |
| 6 | ग्रीन लेजर पेपर रीम | (B2B) | 30 | नग | | |
| 7 | रबर पाकिट | बेस्ट क्वालिटी | 25 | किलो | | |
| 8 | फुट पटट्ी | बेस्ट क्वालिटी | 24 | नग | | |
| 9 | बॉल पेन रू.5/– | बेस्ट क्वालिटी | 100 | नग | | |
| 10 | कॅल्क्युलेटर ब्रॅण्डेड | CITIZEN | 40 | नग | | |
| 11 | कार्बनपेपर शीट (निळा कलर) | बेस्ट क्वालिटी | 10 | नग | | |
| 12 | कटर ब्लेड मेडीयम साईज | बेस्ट क्वालिटी | 30 | नग | | |
| 13 | खोडरबर | बेस्ट क्वालिटी | 30 | नग | | |
| 14 | फेबी स्टिक (8 ग्रॅम) | बेस्ट क्वालिटी | 100 | नग | | |
| 15 | खोका टेप (2 इंची) | बेस्ट क्वालिटी | 48 | नग | | |
| 16 | CD मार्कर पेन (लहान) | बेस्ट क्वालिटी | 24 | नग | | |
| 17 | पेन्सील ब्रॅण्डेड | बेस्ट क्वालिटी | 100 | नग | | |
| 18 | शार्पनर ब्रॅण्डेड | बेस्ट क्वालिटी | 12 | नग | | |
| 19 | स्टॅम्प पॅड निळा (रेग्युलर) | बेस्ट क्वालिटी | 50 | नग | | |
| 20 | स्टॅम्प पॅड शाई (25 मीली) | बेस्ट क्वालिटी | 30 | बॉटल | | |
| 21 | स्टेपलर 10 नं. (रेग्युलर) | KANGARO | 24 | नग | | |
| 22 | स्टेपलर 24/6 नं. | KANGARO | 24 | नग | | |
| 23 | स्टेलपर पीन 10 नं. | KANGARO | 40 | बॉक्स (२० नग) | | |
| 24 | स्टेलपर पीन 24/६ नं. | KANGARO | 40 | बॉक्स (२० नग) | | |
| 25 | टिस्को टेप लहान 1/2" | बेस्ट क्वालिटी | 24 | नग | | |
| 26 | टिस्को टेप मोठा 2" | बेस्ट क्वालिटी | 24 | नग | | |
| 27 | घडयाळ सेल रू.25/– | Duracell | 24 | नग | | |
| 28 | व्हाईटनर पेन (७ ग्रॅम) | बेस्ट क्वालिटी | 24 | नग | | |
| 29 | पेपर फ्लॅग (size 15mmX76mm 5 Colour) | बेस्ट क्वालिटी | 30 | नग | | |
| 30 | पंचिंग मशिन (डीपी 280) | KANGARO | 12 | नग | | |
| 31 | पंचिंग मशिन (डीपी 500) | KANGARO | 06 | नग | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 32 | तंगूस बंडल | बेस्ट क्वालिटी | 06 | नग | | |
| 33 | हायलायटर पेन | बेस्ट क्वालिटी | 24 | नग | | |
| 34 | बॉक्स फाईल मोठी | बेस्ट क्वालिटी | 100 | नग | | |
| 35 | साधी फाईल स्प्रिंगवाली | बेस्ट क्वालिटी | 500 | नग | | |
| 36 | फोलिओ फाईल 4 प्लॅप | बेस्ट क्वालिटी | 100 | नग | | |
| 37 | सेमी बॉक्स फाईल | बेस्ट क्वालिटी | 50 | नग | | |
| 38 | पटट्‌ी फाईल प्लास्टिक | बेस्ट क्वालिटी | 50 | नग | | |
| 39 | फेविक्वीक रू.5 /– | बेस्ट क्वालिटी | 50 | नग | | |
| 40 | पाणी बॉटल (500 मिली) | बिस्लेरी | 120 | बॉक्स | | |

दरपत्रक धारकाचे नाव ..........................................................

सही ...........................................................

शिक्का .........................................................

दिनांक - / / २०२६

# परिशिष्ट “ब”

## हमी पत्र/ दरपत्रक स्वीकृती पत्र

प्रति,
मा. प्रशासक,
श्री शनैश्वर देवस्थान,
शिंगणापूर., ता.नेवासा, जिल्हा अहिल्यानगर.

विषय– दरपत्रक मंजुरीपासून ते 6 महिने करिता (एप्रिल 2026 ते सप्टेंबर 2026 ) भांडार विभागाकरिता विविध स्टेशनरी साहित्य पुरविण्याचे दरपत्रकाबाबत...

महोदय,

खालील सही करणार मी कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध दरपत्रक सूचना वाचली. आपल्या दरपत्रकातील दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून मला आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी मान्य करीत आहे.

मी आपणांस दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या मालाचा, आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री शनैश्वर देवस्थान, शिंगणापूर यांचे भांडार विभाग येथे पोहोच करण्याची हमी देतो. सदर मालाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे दरपत्रक कालावधीत अगर दरपत्रक कालावधी संपल्यानंतरही पुढील खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा 25% पर्यंत जास्त मालाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे.

ज्या मालाचे दरपत्रक मंजुर होतील, त्या मान्य दराने मालाचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर मालाच्या एकुण रकमेच्या 3% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून दरपत्रक मंजुर झाल्याचे कळविल्यापासून 07 दिवसांचे आत मी रोख भरणा करण्यात येईल. याकरीता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच विहीत केलेल्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने दरपत्रक कालावधीत नमुन्याप्रमाणे माल वेळेवर शिंगणापूर, ता. नेवासा, जिल्हा अहिल्यानगर येथील देवस्थानचे मध्यवर्ती भांडार विभाग या ठिकाणी पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक – / / 2026

ठिकाण –

आपला विश्वासू,

फर्मचे मालकाचे सही/सहया व शिक्का

(१) ________________________________________

# <u>परिशिष्ट “क”</u>

## स्वघोषणा पत्र

मी दरपत्रकधारक ........................................................................................................................ ...... स्वतः प्रमाणित करतो की, मी स्वतः साठी अगर दरपत्रक धारकासाठी कुणीही कोणत्याही स्वरूपाचा, कोणत्याही कारणास्तव संस्थानचे विरोधात दावा/अर्ज कोणत्याही न्यायालयात प्रलंबित नाही तसेच दरपत्रक धारकाचे नाव संस्थानचे काळया यादीत समावेश नाही. जर संस्थान विरोधात दावा दाखल केलेला असल्यास सदर दरपत्रक धारकांच्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही याची मला पूर्ण जाणीव आहे.

दरपत्रक धारकाचे नाव .........................................................

सही ................................................

दिनांक – / / 2026